क्रमांक: सीईआर-२०२२/प्र.क्र.४१/३०
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक:२६ एप्रिल ,२०२२.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-
आयुक्त, महानगरपालिका(सर्व)

सही/-
(अभय भंडारी)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

कार्यालय,

पाहिले.

प्रस्तुत परिपत्रकाच्या प्रती सर्व खाते प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना माहिती करिता व योग्य त्या कार्यवाहीकरिता प्रसारित करण्यात याव्यात.

सही/-२७.४.२०२२
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/-२८.४.२०२२
सह आयुक्त(सामान्य प्रशासन)

म.न.पा.आयुक्तांचे कार्यालय,
क्र.प्रकअ/८५/सर्वसा(एमओपी/२७३९)
दिनांक:२८.४.२०२२

प्रत: ------------------------------------------------------------यांना (----- जादा प्रतीसह)
माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

प्रशासकीय अधिकारी(आयुक्त)
महानगरपालिका आयुक्त यांचे कार्यालय

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचा ६२ वा वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२२.**

**महाराष्ट्र शासन**
क्र.सीईआर-२०२२/प्र.क्र.४१/३०,
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २६ एप्रिल, २०२२.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दिनांक १ मे, २०२२ रोजी ६२ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यभर कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत असे शासनाने ठरविले आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी:-

अ) मुंबई, विभागीय मुख्यालये, जिल्हा मुख्यालये, उपविभागीय मुख्यालये, तहसिल मुख्यालये तसेच इतर सर्व ठिकाणी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ८-०० वाजता आयोजित करण्यात यावा. निमंत्रितांना या मुख्य शासकीय समारंभात सहभागी होता यावे, यासाठी या दिवशी सकाळी ०७-१५ ते ०९-०० च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ आयोजित करावासा वाटल्यास त्यांनी तो सकाळी ०७-१५ च्या पूर्वी किंवा सकाळी ०९-०० च्या नंतर आयोजित करावा.

ब) मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये या ठिकाणी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाबरोबरच पोलीस, गृहरक्षक दले, नागरी संरक्षण दले, अग्निशामक दले इत्यादींचा समारंभीय संचलनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

क) मुंबई तसेच विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी व इतरत्र शासकीय इमारतींवर विद्युत रोषणाई करण्यात यावी.

२. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणाऱ्या पथकांच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये येथे संयुक्त संचलनाची व्यवस्था करावी.

३. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपआपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी समारंभाची आवश्यक ती व्यवस्था सर्व संबंधितांच्या सल्लामसलतीने करावी. विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी संबंधित पालकमंत्री ध्वजारोहण करतील. तथापि, खालील तक्त्यातील नमूद विभागीय व जिल्हा मुख्यालयी दर्शविल्यानुसार मा.मंत्री / राज्यमंत्री ध्वजारोहण करतील.

| अ.क्र. | जिल्हा / विभागीय मुख्यालय | ध्वजारोहण करणारे मा.मंत्री / राज्यमंत्री |
|---|---|---|
| १ | बीड | श्री.संजय बनसोडे, मा.राज्यमंत्री पर्यावरण,पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सा.उ), रोजगार हमी, भुकंप पुनर्वसन, संसदीय कार्य |
| २ | गडचिरोली | श्री.राजेंद्र पाटील-यड्रावकर, मा.राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य |

Scanned by CamScanner

४. तसेच तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी शासनाच्या शासन परिपत्रक क्रमांक: सीईआर-२०१५/ ९०१/३०, दिनांक २२ एप्रिल, २०१५ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार विधानसभा / विधानपरिषद सदस्य ध्वजारोहण करतील. ध्वजारोहण करणारे मंत्री महोदय व लोकप्रतिनिधी काही अपरिहार्य कारणांमुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर पोहोचू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच तालुका मुख्यालयी तहसिलदार यांनी ध्वजारोहण करावे व ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल यांची दक्षता घ्यावी.

५. दिनांक १ मे, २०२२ रोजी महाराष्ट्र राज्यात सर्वत्र व सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतींवर (खेड्यामध्ये सुद्धा) तसेच ऐतिहासिक महत्त्वाच्या किल्ल्यावर (उदा: रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद, सिताबर्डी, चंद्रपूर इत्यादी) **राष्ट्रध्वज** उभारण्यात यावा.

६. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक : एफएलजी-१०९१/३०, दिनांक २० मार्च, १९९१, क्र.एफएलजी-१०९१/(दोन)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ तसेच परिपत्रक क्रमांक: एफएलजी-१०९८/३४३/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची खबरदारी घेण्यात यावी. **राष्ट्रध्वज चांगल्या स्थितीत आहे व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घ्यावी.**

७. स्थानिक लोक प्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडील तसेच कोरोनायोध्दा जसे डॉक्टर्स, सफाई कामगार, आरोग्य सेवक यांच्यासह या आजारावर मात केलेल्या काही मर्यादित नागरिकांनाच निमंत्रित करावे.

८. कोरोनाविषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता, महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचा संपूर्ण कार्यक्रम सामाजिक अंतर (Social Distancing) संदर्भातील सर्व नियम पाळून संपन्न होईल, याची संपूर्ण जबाबदारी आयोजकांची असेल. आयोजकांनी त्यानुसार मान्यवरांना निमंत्रित करण्याची कार्यवाही करावी. समारंभास उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींनी राष्ट्रीय पोषाख परिधान करावा.

९. राष्ट्रध्वजाला वंदन करताना "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. याप्रसंगी कोणत्याही अधिकाऱ्यांनी भाषण करु नये. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजवावा.

१०. जिल्ह्यातील संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य, जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, शासन पुरस्कार प्राप्त व्यक्ती, प्रमुख नागरिक आणि शासकीय अधिकारी यांना मुख्य शासकीय कार्यक्रमास निमंत्रित करण्यात यावे.

११. विभागीय आयुक्त, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाकरीता योग्य ती व्यवस्था करणार असल्याने तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग हे पोलीस मुख्यालय, कळंबोली, नवी मुंबई येथील समारंभाची व्यवस्था करतील. मुंबई मध्ये शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे राज्याचा मुख्य शासकीय समारंभ होत असतो, त्यामुळे मुंबई जिल्हा मुख्यालयामध्ये वेगळा कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नये.

१२. ध्वजारोहण समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहण्याबाबत व उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींना समारंभाचे वेळी राष्ट्रीय पोषाख परिधान करण्याबाबतचे आदेश सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना द्यावेत.

१३. संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र दिन साजरा करण्यासंबंधी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. त्यांच्या अधिकार क्षेत्रात त्या दिवशी कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतराच्या नियमांचे पालन करुन सर्व बाबी योग्य तऱ्हेने कार्यान्वित होतील याबाबत त्यांनी व्यक्तीशः दक्षता घ्यावी.

१४. काही ठराविक जिल्ह्यातील कोणत्याही निवडणूकीसंदर्भात आचारसंहिता अंमलात असल्यास सर्व संबंधितांना यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात :-

अ) ध्वजारोहणाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये.

ब) कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर करु नये.

Scanned by CamScanner

क) मा.पालकमंत्री यांच्या भाषणाचा आशय केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक मान्यवरांचे कार्य आणि कर्तृत्व यापुरतेच मर्यादित असावा आणि त्यांनी कोणतेही राजकीय स्वरुपाचे भाषण करु नये. बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या तसेच देशाचा गौरव यापुरतीच भाषणे मर्यादित असावीत.

२६।४।२०२२

(अभय भंडारी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

***********************

क्रमांक : सीईआर-२०२२/प्र.क्र.४१/३०
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २६ एप्रिल, २०२२.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई (२ प्रती),
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती) (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई (पत्राने)
फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग रोड, मुंबई,
जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजराथ विभाग, कुलाबा, मुंबई,
एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वार्टर्स, मेरीटाईस एअर ऑपरेशन्स, आयएफ, बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई-४०० ०२०
स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग (विभागाच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई-४०० ०१८
केंद्र संचालक, आकाशवाणी, मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद
पोलीस आयुक्त, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
सर्व पोलीस उप महानिरिक्षक
महासमादेशक, नगरसेना, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई (पत्राने)
महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर (पत्राने)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, मुंबई.

Scanned by CamScanner

अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, यांचे खाजगी सचिव
विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, सेंट्रल बिल्डीग, पुणे
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-१, मुंबई,
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२, मुंबई
कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग / दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई
संचालक, उद्याने व उपवने, बांधकामभवन, मुंबई.

२६/७/२०२२

(अभय भंडारी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापन दिन - दिनांक १ मे, २०२२

मुंबई

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ७-०० | मा.मुख्यमंत्री व इतर मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा चौकातील हुतात्मा स्मारक येथे हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम होईल. |
| सकाळी | ८-०० | शिवाजी पार्क येथे ध्वजारोहण व संचलन |

विभागीय व जिल्हा मुख्यालये

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ८-०० | ध्वजारोहण<br>संयुक्त संचलन |

उप विभागीय व तहसिल मुख्यालये व इतर ठिकाणी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ८-०० | ध्वजारोहण<br>संयुक्त संचलन |

**********************

Scanned by CamScanner